"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/वसं/2052/2022-23. दिनांक: 15/09/2022.

प्रति,

जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने),
सिडको भवन, सी. बी.डी बेलापुर,
नवी मुंबई 400 614.

विषयः- **वन जमिन रायगड**

वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत सागर तटीय रोड जलमार्ग सेक्टर 16 ते सेक्टर 11, सी.बी.डी.बेलापूर ते जलवाहतुक टर्मिनल नेरुळ नवी मुंबई...सिडको नवी मुंबई यांचा प्रस्ताव... क्षेत्र- 8.2222 हेक्टर

संदर्भः- 1) जनरल मॅनेजर (पर्यावरण व वने) सिडको भवन, सी. बी.डी बेलापुर यांचेकडील पत्र क्र. सिडको/जीएम(फॉरेस्ट)/2022/1575, दिनांक 26/04/2022.

2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/768, दिनांक 27/05/2022.

3) जनरल मॅनेजर (वने) सिडको भवन, सी. बी.डी बेलापुर यांचेकडील पत्र दिनांक 20/07/2022

3) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/1699, दिनांक 03/08/2022.

4) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमिन/1674, दिनांक 10/08/2022.

5) आपलेकडील पत्र दिनांक 29/08/2022.

उपरोक्त संदर्भित पत्र क्र.3 अन्वये जल मार्ग सेक्टर 16 ते सेक्टर 11, सी.बी.डी. बेलापूर ते जलवाहतुक टर्मिनल नेरुळ नवी मुंबई या सागर तटीय रस्त्यासाठी वन (संवर्धन), अधिनियम 1980 अंतर्गत वन जमिन मागणी प्रस्तावात संदर्भित पत्र क्र. 5 चे अनुषगाने त्रृटीची पुर्तता करून या कार्यालयास 1 प्रतीत सादर केला आहे. सदर प्रस्तावांची छाननी केली असता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहे.

1) या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वये उपस्थित केलेल्या मुदद् क्रमांक 3 नुसार 1:50000 या प्रमाणातील टोपोशीट नकाशावर आखणी मार्गापासून नजीकचे कर्नाळा अभयारण्याचे पर्यावरण संवेदनशील (ESZ) क्षेत्राचे अंतर दर्शविलेले आहे तथापी आखणी मार्गापासून कर्नाळा अभयारण्याचे अंतर दर्शविलेले नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक 3 ची परिपूर्ण पूर्तता करणेत आलेली नाही.

2) प्रस्तावांत बाधित होणा-या वनक्षेत्राचे बदल्यात मौज न्हावे येथील पर्यायी वनेतर क्षेत्राचा नकशा सादर केला आहे. तथापी त्यामध्ये कोणत्या सर्व्हे नंबर/हिस्सा नं. चे क्षेत्र पर्यायी क्षेत्र म्हणून दर्शविले आहे याची स्पष्टता होत नाही. तरी त्यामध्ये पर्यायी वनेतर क्षेत्राचे सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर दर्शविणे आवश्यक आहे.

3) प्रस्तावांतर्गत बाधीत होणा-या क्षेत्राची property KML File सादर केलेली दिसून येत नाही.

तरी वरील प्रमाणे त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत प्रस्ताव आवश्यकत्या दस्तऐवजासह आठ प्रती या कार्यालयास सादर करणेत यावा.

(संजय कदम)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल व वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल व उरण यांना माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी.

2/- सदर प्रस्तावात वन परिक्षेत्र अधिकारी, पनवेल व उरण यांनी मोका पहाणी करून बाधीत होणारे वनक्षेत्रांत वृक्षतोड होणार आहे अगर कसे याबाबत खात्री करुन जर वृक्षतोड होणार असेल तर बाधीत होणारे वृक्षांचे यादीसह वृक्षतोडीचे अंदाजपत्रक विहीत प्रपत्रात आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन आठप्रती अंदाजपत्रक या कार्यालयास सादर करावा. तसेच पर्यायी वनीकरणाकरीता प्रकल्प यंत्रणेकडून मौजे न्हावे ता. पनवेल येथील क्षेत्र हे वन विभागाचे ताब्यांत देण्यात आलेले आहे. तथापी सदर ठिकाणी कांदवळवनाचे क्षेत्र असल्याने त्यामध्ये पर्यायी वनीकरण करणे शक्य होणार नाही. तरी सदर प्रकल्पांत बाधीत होणारे क्षेत्रा ऐवढे अवनत वनक्षेत्र पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावीत करणेत यावे व त्यानुसार आवश्यकते नकाशे, पॉलीगॉन KML File, पर्यायी वनीकरणाची योजना व क्षेत्र वनीकरणाकरीता सुयोग्य असल्याबत विहित पत्रपत्रांतील प्रमाणपत्र आठ प्रतीत सादर करावे.

प्रतः वनक्षेत्र सर्व्हेक्षक, विभागीय कार्यालय, अलिबाग यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.